# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly Pune University)

Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone : 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट / Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. सीए/ 2107 दिनांक : 26.09.2024

**तातडीचे व महत्वाचे**

प्रति,

**मा.प्राचार्य / संचालक**

संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय : बीबीए_बीसीए / (बी.कॉम–बीएम, बी.कॉम.–आयबी, बी.कॉम–सीए) (बी.एस्सी कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) या अभ्यासक्रमांसंदर्भात भरावयाच्या हमीपत्राबाबत..**

संदर्भ : १. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र संदर्भ क्र.२/ एनजीसी / मान्यता / BBA_BMS_BCA/2024/27, दि. १७/०१/२०२४.
२. संलग्नता कक्ष (शैक्षणिक विभाग) पत्र संदर्भ पत्र क्र. सीए/९३९, दि. ०८/०६/२०२४
३. मान्यता कक्ष (शैक्षणिक विभाग) चे परिपत्रक क्र. १०६/२०२४ व १०८/२०२४.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरून प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालये / परिसंस्थांनी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या अखत्यारित आणलेले BBA_BCA या अभ्यासक्रमासाठी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता न घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने BBA_BCA व तत्सम अभ्यासक्रमाच्या नामाभिधानाच्या बदलाबाबत निर्गमित केलेले परिपत्रक क्र. १०६/२०२४ (बी.कॉम–बीएम, बी.कॉम.–आयबी, बी.कॉम–सीए) व १०८/२०२४ (बी.एस्सी कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) नमुद केलेल्या अभ्यासक्रमाचा स्वीकार केलेला आहे.

तसेच ज्या महाविद्यालये / परिसंस्थांनी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या अखत्यारित आणलेले BBA_BCA व तत्सम या अभ्यासक्रमासाठी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे अर्ज केलेला असून त्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानंतर संबंधित महाविद्यालय / संस्थांनी सदर मान्यता रद्द करण्याबाबत आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व शासनाकडे अर्ज सादर केला आहे परंतू त्यांच्याकडून अदयाप मान्यता मिळालेली नाही अशांनी परिपत्रक क्र. १०६/२०२४ व १०८/२०२४ नुसार नमुद केलेल्या अभ्यासक्रमाचा स्वीकार केलेला आहे. अशा आशयाचे हमीपत्र संबंधित महाविद्यालयांनी रू. ५००/– च्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक आहे.

सदर बाब विचारात घेता सोबत जोडलेले हमीपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे सोबत जोडून विद्यापीठाच्या www.unipune.ac.in संकेतस्थळावर BCUD LOGIN > ONLINE SERVICES > AFFILIATION येथे दि. २८/०८/२०२४, सायं. ०६.०० वा. पर्यंत अपलोड करण्यात यावीत व हमीपत्राची मुळ प्रत पुढील ८ ते १० दिवसात संलग्नता कक्षामध्ये जमा करावी.

कळावे,

उपकुलसचिव
(संलग्नता कक्ष)

# हमीपत्र

(रू. ५००/— च्या स्टॅप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र)

असे हमी देण्यात येते की, ..........(संस्थेचे नाव).................... या संस्थेचा अध्यक्ष/सचिव श्री...................................................... व .............(महाविद्यालयाचे नाव)................या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री......................................................आम्ही अशी हमी देतो की,

१. आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या अखत्यारित आणलेले BBA_BCA व तत्सम या अभ्यासक्रमासाठी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे अर्ज न करता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने BBA_BCA व तत्सम अभ्यासक्रमाच्या नामाभिधानाच्या बदलाबाबत निर्गमित केलेले परिपत्रक क्र. १०६/२०२४ व १०८/२०२४ (जे परिपत्रक लागू असेल ते) चा स्वीकार केलेला आहे.

किंवा

२. आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या अखत्यारित आणलेले BBA_BCA व तत्सम या अभ्यासक्रमासाठी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे अर्ज केलेला असून त्यास मान्यता मिळालेली आहे, परंतू नंतर सदर मान्यता रद्द करण्यासाठी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व महाराष्ट्र शासनाकडे अर्ज केलेला आहे. परंतू त्याच्याकडून अदयाप मान्यता मिळालेली नाही आशांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने BBA_BCA व तत्सम अभ्यासक्रमाच्या नामाभिधानाच्या बदलाबाबत निर्गमित केलेले परिपत्रक क्र. १०६/२०२४ व १०८/२०२४ नुसार नमुद केलेल्या अभ्यासक्रमाचा महाविद्यालयाने स्वीकार केलेला आहे. (लागू असल्यास)

आम्ही असेही लिहून देतो की, जर आम्ही BBA_BCA व तत्सम हे अभ्यासक्रमासाठी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता मिळविलेली आहे तसेच विद्यापीठाने BBA_BCA व तत्सम अभ्यासक्रमाच्या नामाभिधानाच्या बदलाबाबत निर्गमित केलेले परिपत्रकानुसार नमुद केलेल्या अभ्यासक्रमाचाही स्वीकार केलेला आहे किंवा BBA_BCA व तत्सम या अभ्यासक्रमासाठी आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे अर्ज केलेला असून नंतर मान्यता रद्द केलेली असून त्याबाबतची सदर मान्यता रद्द करण्यात आल्याची पत्र आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त न होताच परिपत्रक क्र. १०६/२०२४ व १०८/२०२४ नुसार नमुद केलेल्या अभ्यासक्रमाचा स्वीकार केलेला आहे (लागू असल्यास). असे निदर्शनास आल्यास याबाबत भविष्यात काही अडचणी तक्रारी, न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास त्याची सर्व जबाबदारी संस्था/महाविद्यालयाची राहील.

| प्राचार्य | अध्यक्ष/सचिव |
|---|---|
| सही/शिक्का:<br>नाव:<br>महाविद्यालयाचे नाव: | सही/शिक्का:<br>नाव:<br>संस्थेचे नाव: |